# मे. वडेगाव मॅग्नीज ओअर मायनिंग प्रोजेक्ट, मौजा-वडेगाव, ता. रामटेक, जिल्हा-नागपुर (3.97 हेक्टर) उत्पादन करण्याकरीता पर्यावरण विषयक पुन:जाहिर जन सुनावणीचे इतिवृत्त.

| | |
|---|---|
| **सुनावणीचे ठिकाण** | **प्रकल्प स्थळ मे. वडेगाव मॅग्नीज ओअर मायनिंग प्रोजेक्ट, मौजा-वडेगाव, ता. रामटेक, जिल्हा-नागपुर** |
| **सुनावणीची तारीख** | 07/01/2017 |
| **सुनावणीची वेळ** | **दुपारी 11.00 वाजता** |

.........

मे. वडेगाव मॅग्नीज ओअर मायनिंग प्रोजेक्ट, मौजा-वडेगाव, ता. रामटेक, जिल्हा-नागपुर (3.97 हेक्टर) उत्पादन करण्याकरीता प्रस्तावित असून सदरील प्रकल्पास केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या दि. 14 सप्टेंबर 2006 च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिकृत सुचनेनुसार (EIA Notification 2006) पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणी घेणे बंधनकारक आहे.

मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या आदेशान्वये दि. 07/01/2017 रोजी पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणी प्रकल्प स्थळ, मे. वडेगाव मॅग्नीज ओअर मायनिंग प्रोजेक्ट, मौजा-वडेगाव, ता. रामटेक, जिल्हा-नागपुर हया ठिकाणी (प्रस्तावित प्रकल्पाचे असल्यामुळे व लोकांचे सोयीचे असल्यामुळे) सकाळी 11.00 वाजता जन सुनावणी घेण्याचे निश्चित करण्यात आले.

पर्यावरण विषयक पुन्हा जाहिर जन सुनावणी संदर्भात दैनिक "तरु ा भारत" या मराठी वर्तमानपत्रात व दैनिक "हितवाद" इंग्रजी वर्तमानपत्रात जाहीरात दि. 07/12/2017 रोजी प्रसिदध करण्यात आली. **(सहपत्र-1)** प्रकल्पाच्या पर्यावरण

आघात मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची प्रत ही मराठी व इंग्रजी भाषेत उपलब्ध असलेल्या कार्यालयांची माहिती देण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, यांनी जाहिर जन सुनावणी संबंधीत कार्यालयीन आदेश क्र. ई- 72/2014 दि. 22/07/2014 रोजी पारित केले त्यानुसार खालील नमूद केलेल्या सदस्यांची समिती प्रस्तावित जन सुनावणीसाठी नेमण्यात आली.

१. श्री. के. एन. राव — अध्यक्ष
अतिरीक्त जिल्हाधिकारी, नागपूर
(मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे प्रतिनिधी)

२. श्री ना. शा. लोहळकर, प्रादेशिक अधिकारी, — सदस्य
प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, नागपूर.

३. श्रीमती हेमा देशपांडे, — समन्वयक
उप-प्रादेशिक अधिकारी-1
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर.

उपस्थित असलेल्या इतर मान्यवरांची यादी सोबत जोडत आहे. **(सहपत्र-2)**

सदरील जाहीर लोक सुनावणीला समितीचे अध्यक्ष, तथा अतिरीक्त जिल्हाधिकारी श्री. के. एन. राव, अतिरीक्त जिल्हाधिकारी नागुपर यांच्या परवानगीने सकाळी दुपारी 11.00 वाजता सुरवात करण्यात आली. सुरवातीस सौ. हेमा देशपांडे, उप प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, नागपूर १ यांनी सदरील लोकसुनावणीस उपस्थित असलेले मा. जिल्हाधिकारी नागपूर यांचे प्रतिनिधी, श्री. के. एन. राव, अतिरीक्त जिल्हाधिकारी नागपुर, प्रकल्प प्रवर्तक व जाहीर लोकसुनावणीस उपस्थित असलेल्या नागरीकांचे स्वागत केले आणि प्रस्तावित प्रकल्पाची जाहीर लोक सुनावणीबाबत प्रस्तावना ठेवली. त्यांनी पुढे अशी माहिती दिली कि, केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयाच्या १४/०९/२००६ च्या अधिसुचनेतील तरतूदी नुसार प्रकल्प उभारण्यापूर्वी सदर प्रकल्पा बाबत जाहिर लोकसुनावणी घेणे बंधन कारक असल्यामुळे तसेच

या प्रकल्पाबाबत स्थानिक मते जाणुन घेण्यासाठी प्रकल्पाबाबतची संपूर्ण माहितीचे आकलन स्थानिक ग्रामस्थांना व्हावे याकरिता या जाहीर लोक सुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर संबंधित **प्रकल्पाला पर्यावरण विषयक मान्यता देण्या** बाबतीत उपस्थितांचे जे सुचना, विचार, टीका, टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी, मुद्दे, तक्रारी असतील त्याची तोंडी /लेखी नोंद घेण्यात येईल व त्या संदंर्भात उत्तरे प्रकल्प प्रस्तावक अथवा प्रकल्प प्रवर्तकाला तांत्रिक साहय करणा-या तांत्रिक सल्लागाराद्वारे देण्यात येतील असे सांगितले.

तद्नंतर अतिरिक्त जिल्हाधिकारी –नागपूर (जिल्हाधिकारी, नागपूर यांचे प्रतिनिधी) यांनी प्रकल्प **प्रस्तावकास** प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास सांगितले. प्रकल्प प्रवर्तकाकडून **मे. वडेगाव मॅग्नीज ओअर मायनिंग प्रोजेक्ट, मौजा-वडेगाव, ता. रामटेक, जिल्हा-नागपुर.** यांनी प्रस्तावित प्रकल्पा संदंर्भातील माहिती लोकांसमोर सादर केली.

सादरीकरणामधिल खालील बाबींचा समावेश करण्यात आला होता.

1. प्रकल्पाची गरज
2. निर्मिती प्रक्रिया
3. **पर्यावरणावरील परीणाम**
4. हवा, पाणी, जमिन, ध्वनि, जैविक इत्यादिंचे त्या क्षेत्रातील प्रमाण
5. हवा, पाणी, जमिन, ध्वनि, जैविक इत्यांदिवर प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारे परिणाम
6. पर्यावरण व्यवस्थापन अहवाल
7. **सुरक्षा व्यवस्था**
8. सामाजिक बांधिलकी

अतिरिक्त जिल्हाधिकारी –नागपूर (जिल्हाधिकारी, नागपूर यांचे प्रतिनिधी) यांनी उपस्थितांना सादरीकरण समाप्त झाल्यानंतर प्रस्तावित प्रकल्पा संदंर्भात काही प्रश्न विचारावयाचे असल्यास किंवा काही मुद्दे, तक्रारी उपस्थित करावयाचे असल्यास त्यांनी उपस्थित करावे या प्रश्नांना प्रकल्प **प्रस्तावक** अथवा प्रकल्प **प्रस्तावक** तांत्रिक प्रतिनिधी उत्तरे देतील असे सांगितले. त्यानुसार जाहीर लोकसुनावणीस उपस्थित असलेल्या नागरीकांनी विचसालेले प्रश्न व त्यास अनुसरून प्रकल्प प्रवर्तकाने दिलेले उत्तर खालील प्रमाणे आहेत:–

| अनु क्र. | नाव व हुद्दा | उपस्थित केलेला मुद्दा | चर्चा |
|---|---|---|---|
| 1 | श्री. संजय सत्यकार, शेतकरी नेते, रा. कन्हान, नागपुर | • सदरील लोकसुनावणी बाबत स्थानिक लोकांना माहिती नाही. | • मा. अध्यक्ष यांनी सांगितले की वर्तमान पत्रात प्रसिदध केलेली जाहिरात आणि संबंधीत कार्यालयात उपलब्ध करुन ठेवलेल्या नस्ती.<br>• Mining Expert - Existing Mine मधुन पाणी काढुन बाजुच्या खडडयामध्ये टाकु, नाल्याचा वापर Ducting करीता वापर करु.ध् |
| 2 | मिनाक्षी वाघधरे, सरपंच, गट ग्रामपंचायत किरणापुर | • ग्रामपंचायतची नाहरकत प्रमाणपत्र घेतलेली नाही.<br>• शेत लागुन आहे लेखी निवेदन देत आहे. | • प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की ग्रामपंचायतची परवानगी परवानगी दिलेली नाही. |
| 3 | वाडीभस्मे, काचुरवाही | • कास्तकाराला परवानगी NOC मागितली नाही. | • प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की शेती या प्रकल्पामध्ये जाणार नाही. |
| 4 | सुमेध काटोगे | • जनसुनावणी गावात केली नाही.<br>• या प्रकल्पामुळे पाण्याची | • हेमा देशपांडे उप प्रादेशिक अधिकारी यांनी सोगितले की प्रकल्प स्थळीच जनसुनावणी घेण्यात येते. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पातळी कमी होईल. | • प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की ही ओपन कास्ट माईन आहे. वॉटर लेव्हल उन्हाळयामध्ये कमी होईल परंतु Recharging ची व्यवस्था करु. |
| 5 | आकाश सहारे सकाळ प्रतिनिधी | • गावामध्ये माहिती नाही.<br>• गावाला यापासुन लाभ नाही.<br>• गावासाठी काय तरतुद आहे.<br>• पाण्याची व्यवस्था काय करणार.<br>• रोजगार स्थानिकांना मिळणार. | • प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की ही पाणी वापरणार नाही. त्यामुळे गावाच्या पाण्याच्या पातळीवर परीणाम होणार नाही.<br>• स्थानिक लोकांना रोजगार ग्रामपंचायतला कळवु.<br>• Dewatering करणार नाही.<br>• खंडडयामध्ये साचलेल्या पाणी उपलब्ध करुन देवु सरकारने परवानगी दिल्यास. ▯▯ |
| | श्री. संजय सत्यकार, | • Dewatering केल्यामुळे आजुबाजच्या विहरी व सिंचन विहिरी ची पातळी कमी होणार त्याबाबतचा अहवाल आहे का.<br>• Dewatering मुळे पाण्याची पातळी कमी | • अध्यक्षानी प्रकल्प प्रवर्तकास Ground Water Depleting चा Study करावा असे सांगितले. |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | शेतकरी नेते, रा. कन्हान, नागपुर आणि अरुण देवरस | होणार नाही कारण हि जागा वर आहे. त्यामुळे पाणी वरुण खाली जाईल. | |
| | | • Social Impact चा काय अहवाल आहे. | • प्रकल्प प्रवर्तकाने Segregation, Mining लोकल लोकाकडुन करावा EIA Report मध्ये अहवाल आहे.<br>• Social Impact मध्ये लोकाचे नाव आहे. |
| | | • Corporate representative च काय, रस्ते सुधारचे काय. | • C. M. Singh - रस्ता Maintain करु (आजुबाजुचे) PWD व G.P. मार्फत Toilet बांधुन देऊ (Turnover %) Profit च्या 2 % खर्च करु. |
| 7 | ईश्वर हटवार, उप सरपंच, ग्रामपंचायत आणि सरपंच | • आधी खदान सुरु असतांना ग्रामपंचायतच्या लोकांना रोजगार दिला.<br>• 2002 ला लिज मिळाली तेव्हापासुन काम बंद आहे. ग्रामपंचायतला पुर्वी कधीही दिलेले नाही Social Respons बाबत कोणालाही माहिती विचारली नाही. | • अध्यक्षांनी सांगितले की Village development Committee from करावी व त्या committee मार्फत खर्च करणार हे कळवावे.<br>• ग्रामपंचायतला Requirement कळवा.<br>• ग्रामपंचायत कडे Proceeding दया. |
| 8 | बावनकुळे | • Eligibity candidate | • |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ग्रामपंचायत कडुन उमेदवार उपलब्ध करावा. | |
| 9 | आरती परंकराजे | • गावाच्या विकासाकरीता सामाजीक विकास करावा, काचुरवाही गावामधील 70 % सुशीक्षीत आहे. त्याच मुलांना रोजगार दयावा. | • अध्यक्ष - Project Report ग्रामपंचायतच्या सहमती नी तयार करावा.<br>• Project incharge व गामपचायत यांच्यामध्ये समन्वये समिती तयार करावी व 3 महिन्यात Meeting घ्यावी. ग्रामसभेत Cordination मध्ये ठरलेले मुददे घ्यावे. दळणवळणाच्या वेळ लोंकांना त्रास होऊ नये. |

मा. अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपुर यांनी उपस्थित लोकांना प्रश्न विचारण्यासंदर्भात आवाहन केले परंतु कोणाकडुनही प्रश्न/मुद्दे/तक्रारी नोंदविण्यात आली नाही.

समारोपादरम्यान माननीय अध्यक्ष यांनी असे सूचित केले कि, प्रस्तावित प्रकल्प सभोवतालच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे प्रदुषण होणार नाही या दृष्टिने कंपनी प्रशासनाने उपाय योजना करणे आवश्यक आहे तसेच प्रकल्पाच्या क्षेत्रात वृक्षावरोपण व वृक्षसंवर्धन योग्य रितीने करण्यात यावे.

आजच्या लोक सुनावणीमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यांबाबत कंपनी प्रशासनाने जी माहिती सादरीकरणाद्वारे तसेच पर्यावरणीय आघात मुल्यांकन अहवालात नमूद केलेले आहे याचे तंतोतंत पालन होणे आवश्यक आहे.

अतिरिक्त जिल्हाधिकारी –नागपूर (जिल्हाधिकारी, नागपूर यांचे प्रतिनिधी) यांनी असे निदर्शनास आणले कि, आजच्या लोकसुनावणीच्या माध्यमातून उपस्थित ग्रामस्थांनी जे मुद्दे/विचार व्यक्त केले आहे त्याची लेखी व छाया चित्रणाद्वारे नोंद घेण्यात आली असून त्याचा अहवाल सारांश रूपात तयार करण्यात येवून तो दिल्ली येथिल, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडे पाठविण्यात येईल. केंद्र शासनाने परवानगी दिल्यानंतरच प्रस्तावित कारखाना सुरू

होईल. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळा मार्फत कारखान्याची नियमित पणे तपासणी करण्यात येईल व काही आक्षेपार्ह बाबी आढळल्यास कंपनीवर पर्यावरणीय कायद्यांन्वये कारवाईचे अधिकार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास राहतील.

तद्नंतर अतिरिक्त जिल्हाधिकारी—नागपूर (जिल्हाधिकारी, नागपूर यांचे प्रतिनिधी) **यांच्या परवानगीने** लोक सुनावणीस उपस्थित राहून आपले विचार व्यक्त केल्या बद्दल उपस्थित सर्व ग्रामस्थांचे आभार मानले व लोक सुनावणी समाप्त झाल्याचे घोषित केले. **प्रकल्प प्रवर्तकाने लोकसुनावणी दरम्यान दिलेली वचने दि. ३० मार्च २०१७ रोजी कार्यालयात दाखल केली आहे. (प्रत सोबत जोडत आहे)**

**(ना. शां. लोहळकर)**
प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि. मंडळ **नागपुर व**
सदस्य,
जन सुनावणी समिती

**(हेमा देशपांडे)**
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, नागपूर १
आयोजक,
जन सुनावणी समिती

**(के. एन. राव)**
अतिरिक्त जिल्हाधिकारी
नागपूर
अध्यक्ष,
जन सुनावणी समिती